20 OCT 2021
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कॉलेजांमध्ये आजपासून गजबज; दीड वर्षानंतर कट्ट्यांवर धमाल

## विद्यार्थ्यांमध्ये उत्साह, पण लसीच्या अटीमुळे उपस्थितीवर मर्यादा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** तब्बल दीड वर्षाहून अधिक काळानंतर आज, बुधवारी महाविद्यालयांचे कट्टे विद्यार्थ्यांनी फुलणार असून, विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. त्याचवेळी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही संपूर्ण तयारी केली आहे. मात्र, लसीचे दोन्ही डोस घेतलेले १८ वर्षांवरील विद्यार्थीच महाविद्यालयांत उपस्थित राहू शकणार असल्याने पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीला मर्यादा येणार आहे.

राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दिलेल्या परवानगीनंतर व निर्देशांप्रमाणे मुंबई विद्यापीठासह इतर विद्यापीठांनी आपापल्या परिक्षेत्रातील संलग्नित महाविद्यालयांना मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. त्याप्रमाणे इतके दिवस बंद असलेल्या महाविद्यालयांत साफसफाई, खोल्यांचे निर्जंतुकीकरणाची कामे सुरू आहेत.

येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याची आरोग्य तपासणी, शारीरिक तापमान, तोंडावर मास्क आदी नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाणार आहे. या प्राथमिक उपाययोजनांसह लसीच्या दोन मात्रा घेतलेल्या विद्यार्थ्यांना वर्गात बसण्याची परवानगी मिळणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना प्रवासात कोणतीही अडचण येऊ नये यासाठी लसीचे दोन डोस पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना लोकल प्रवासाची मुभा देण्यात आली असल्याचे या आधीच स्पष्ट करण्यात आले आहे.



महाविद्यालये आज, बुधवारपासून पुन्हा सुरु होणार असल्याने सर्व वर्गांमध्ये निर्जंतुकीकरणाचे काम आधीच सुरू करण्यात आले.

### कृषी महाविद्यालयेही आजपासून सुरू

- राज्यातील सर्व कृषी विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये तसेच विद्यालये आज सुरु होत आहेत. कोरोनामुळे सर्व वर्ग मागील दोन वर्षे बंद होते.
- महाविद्यालये सुरू करताना काही अटीही घातल्या आहेत. त्यात १८ वर्षांवरील विद्यार्थ्यांनी कोरोना विरोधी लसीचे दोन डोस घेतलेले असावेत. ज्यांना महाविद्यालयात उपस्थिती लावणे शक्य होणार नाही, त्यांच्यासाठी ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी सूचना देण्यात आली आहे.
- ५० टक्क्यांपेक्षा जास्त विद्यार्थी उपस्थित ठेवायचे असतील, तर संबंधित आस्थापनांनी स्थानिक अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून निर्णय घ्यायचा आहे.

### दुकाने रात्री ११, तर हॉटेल रात्री १२ पर्यंत सुरू

**मुंबई :** सर्व प्रकारची दुकाने रात्री ११ पर्यंत, तर हॉटेल, रेस्टॉरंट रात्री १२ पर्यंत सुरु ठेवण्यास राज्य शासनाने अनुमती दिली आहे. हा आदेश तत्काळ लागू झाला आहे. दुकाने आणि हॉटेल, रेस्टॉरंटच्या वेळा वाढवून देण्यात येतील, असे आश्वासन मुख्यमंत्री ठाकरे यांनी सोमवारी दिले होते. त्यानुसार मंगळवारी आदेश निघाला. या वेळांमध्ये परिस्थिती पाहून कपात करण्याचे अधिकार स्थानिक प्रशासनाला असतील; पण वेळ वाढवण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची परवानगी आवश्यक असणार आहे.

### अशी घ्यावी काळजी

१. लसीचे दोन डोस पूर्ण न केलेल्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वर्गात उपस्थितीची परवानगी नसली तरी त्यांचे ऑनलाइन वर्ग सुरू ठेवण्याची तयारी करणे आवश्यक असणार आहे.

२. ज्यांचे लसीकरण झालेले नाही किंवा लसीचा दुसरा डोस बाकी आहे, त्यांना महाविद्यालयांमार्फत लसीकरणाची व्यवस्था करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

३. महाविद्यालयांत वैद्यकीय कक्ष आवश्यक असून विद्यार्थ्यांना पूर्ण वेळ मास्क घालणे व सामाजिक अंतर राखणे बंधनकारक असणार आहे.

४. यूजीसी व शासनाने कोविड-१९ संबंधित दिलेल्या सर्व नियमांचे काटेकोर पालन आवश्यक आहे.

### एका दिवसात अभ्यासक्रम पूर्ण करायचा का?

पुणे विद्यापीठाने चालू सत्राचा अभ्यासक्रम विहीत काळात शिकवून पूर्ण करण्याची जबाबदारी सर्व प्राचार्य व प्राध्यापकांवर टाकली आहे. २० ऑक्टोबर रोजी महाविद्यालये सुरू करण्यास परवानगी दिली असली तरी कला, वाणिज्य आणि विज्ञान या अभ्यासक्रमांचे पहिले सत्र २० ऑक्टोबर रोजीच संपणार आहे. त्यामुळे एका दिवसात अभ्यासक्रम पूर्ण करायचा का, असा सवाल प्राचार्यांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

लोकमत

# कॉलेज कॅम्पस फुलणार

## दोन डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश

कोल्हापूर : तब्बल दीड वर्षांनंतर आज, बुधवारी कोल्हापुरातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे वर्ग ऑफलाईन पद्धतीने भरणार आहेत. त्यामुळे कॉलेज कॅम्पस विद्यार्थ्यांनी फुलणार आहे. कोरोना लसीचे दोन डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांना ऑफलाईन वर्गात प्रवेश मिळणार आहे.

महावीर महाविद्यालयात विद्यार्थांचे स्वागत तसेच एक डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण दिले जाणार असल्याचे प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे यांनी सांगितले. डी.आर.के कॉमर्स कॉलेजमध्ये अंतिम वर्षाची प्रवेश प्रक्रिया पहिल्यांदा होईल. गुरूवारपासून वर्ग सुरू होणार असल्याचे प्राचार्य डॉ. विलास पाटील यांनी सांगितले. ५० टक्के उपस्थिती आणि दोन डोसच्या नियमांचे पालन केले जाईल, असे न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी सांगितले. नियमांचे पालन करून अंतिम वर्षाचे वर्ग विवेकानंद कॉलेजमध्ये भरणार असल्याचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी सांगितले. ज्यांनी दोन डोस घेतले आहेत. त्यांनी महाविद्यालयात यावे, अशी सूचना केल्याचे कमला कॉलेजचे उपप्राचार्य पी. एस. जाधव व गोखले कॉलेजच्या प्रशासनाधिकारी डॉ. मंजिरी मोरे यांनी सांगितले.

20 OCT 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# विद्यापीठ कल्याण निधी योजनेंतर्गत सहा महिन्यांत १ कोटींहून अधिक निधी प्रदान

## मृत विद्यार्थी, पालकांसह शिक्षक, कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना मदत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी, पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी कल्याण निधी योजनेअंतर्गत कोव्हिड-१९ च्या दुसऱ्या लाटेच्या कालखंडात १ कोटी ५ लाख ७५ हजार रुपयांचे ११३ प्रस्ताव मंजूर करण्यात आल्याची माहिती विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी दिली.

विद्यापीठ कल्याण निधी योजनेच्या अनुषंगाने 'शिव-वार्ता संवाद' या विशेष मुलाखतीत डॉ. गुरव बोलत होते. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी मुलाखत घेतली. डॉ. गुरव म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने विद्यार्थी विकास विभागामार्फत २०१४-१५ पासून कल्याण निधी योजना सुरू केली. याअंतर्गत या घटकांकडून प्रतिवर्षी माफक शुल्क आकारले जाते. यातील कोणाही घटकाचा नैसर्गिक मृत्यू वा अपघाती मृत्यू झाल्यास वारसांना निधी



शिवाजी विद्यापीठातून...

प्रदान केला जातो.

२०१४-१५ पासून ते २०२०-२१ या कालावधीत ४ कोटी ४६ लाख १५ हजार ७९२ रुपयांचा निधी संकलित झाला. २ कोटी ६० लाख रुपयांच्या निधीचे विविध घटकांना वितरण करण्यात आले. यावर्षी कोव्हिड-१९ च्या साथीमुळे कल्याण निधीसाठी एप्रिल ते सप्टेंबर २०२१ या हा महिन्यात ११३ प्रस्ताव प्राप्त झाले. यात दहा विद्यार्थ्यांसह ८५ पालक व १८ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. त्यांना १ कोटी ५ लाख ७५ हजार रुपयांचा निधी वितरित करण्यात आल्याचे डॉ. गुरव यांनी सांगितले.

### विद्यार्थी-पालकांमध्ये सुसंवादाची गरज

तरुण वयातील विद्यार्थी व त्यांचे पालक यांच्यात सुसंवाद प्रस्थापित होण्याची आवश्यकता आहे. अनेक पालकांचे मृत्यू व्यसनाधिनतेमुळे झाल्याचे दिसते. त्याची कारणमीमांसा केल्यास मानसिक तणावग्रस्तता असते. सुसंवादातून यावर मार्ग निघू शकतो. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांचे मृत्यू हे बेदरकारपणाने दुचाकी वाहने चालविल्याने अपघातात झाले आहेत. विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियम पाळण्यापासून ते जबाबदारीने वर्तन करण्यापर्यंत समुपदेशनाची गरज असल्याचे मत डॉ. गुरव यांनी व्यक्त केले.

20 OCT 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाविद्यालये, अधिविभागातील अंतिम वर्षाचे वर्ग आजपासून सुरू

## शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात ६० हजार विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना नियमांचे पालन करून शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालये, अधिविभागातील अंतिम वर्षाच्या प्रथम सत्राचे वर्ग बुधवार (दि. २०) पासून सुरू होणार आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रात सुमारे ६० हजार विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

राज्य सरकारने कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार बुधवारपासून विद्यापीठ कार्यक्षेत्रातील २७६ महाविद्यालये, विद्यापीठातील ४० अधिविभाग सुरू होणार आहेत. अंतिम वर्षाचे वर्ग सुरू करताना राज्य शासन, जिल्हा प्रशासन आणि विद्यापीठ प्रशासनाने दिलेल्या कोरोना मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याबाबत कुलसचिवांनी परिपत्रकाद्वारे प्राचार्यांना कळविले आहे. स्थानिक प्रशासनासमवेत चर्चा करून विद्यार्थ्यांचे शंभर टक्के लसीकरण पूर्ण करून घ्यावे. ज्या भागात कोरोना संसर्ग कमी आहे, अशा ठिकाणची महाविद्यालये, अधिविभाग सुरू करण्याची जिल्हा प्रशासनाकडून परवानगी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.


शिवाजी विद्यापीठातून...

- संलग्नित महाविद्यालये - २७६
- विद्यापीठातील अधिविभाग - ४०

महाविद्यालये, विद्यापीठातील अधिविभाग, विद्यार्थी, विद्यार्थिनी वसतिगृहांची स्वच्छता, सॅनिटायझेशन पूर्ण झाले आहे. ग्रंथालये, महाविद्यालये आणि विद्यापीठ अधिविभागात दोन डोस पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. विद्यापीठातील विद्यार्थी, विद्यार्थिनी वसतिगृह सुरू करण्याची तयारी सुरू आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून वसतिगृहांचा आढावा घेतला जाणार आहे. त्यांच्याकडून मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्यानंतर कमी क्षमतेवर वसतिगृह सुरू होतील.

वसतिगृहात प्राधान्यक्रमाने अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे.

पुढारी

# कॉलेज, कृषी महाविद्यालये आजपासून सुरू

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील सर्व कृषी विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्नित शासकीय व खासगी विनाअनुदानित विद्यालये व महाविद्यालयातील नियमित वर्ग बुधवार (दि. २०) पासून सुरू करण्यास मान्यता देण्यात येत असल्याची माहिती राज्याचे कृषिमंत्री दादाजी भुसे यांनी दिली.

राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील इयत्ता बारावीपर्यंतचे वर्ग ४ ऑक्टोबरपासून सुरू करण्यात आलेले आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थी हे १८ वर्षांवरील असून बहुतेक विद्यार्थ्यांचे लसीकरण पूर्ण झाले आहे. याचबरोबर राज्यातील कोरोनाबाधितांची संख्या कमी आहे. सद्य:स्थितीत ही साथ नियंत्रणात आल्याचे दिसून येत आहे. या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाने १३ ऑक्टोबर २०२१ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयामधील नियमित वर्ग २० ऑक्टोबर २०२१ पासून सुरू करण्यास मान्यता दिली आहे. यास अनुसरून पान २ वर ▸

# कॉलेज, कृषी महाविद्यालये आजपासून सुरू

(पान १ वरून) कृषी विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्न विद्यालये आणि महाविद्यालये सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

विद्यालये अथवा महाविद्यालय, विद्यापीठात येताना सर्व १८ वर्षावरील विद्यार्थ्यांनी लसीचे दोन डोस घेतलेले असावेत. ज्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष महाविद्यालयात उपस्थित राहता येणार नाही, त्यांचेसाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून द्यावी. ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेने वर्ग सुरू करण्याविषयी स्थानिक प्रशासनाशी विचारविनिमय करून कृषी विद्यापीठांनी निर्णय घ्यावा, त्यानुसार महाविद्यालयांना सविस्तर मार्गदर्शक सूचना / मानक कार्यप्रणाली (एसओपी) द्यावी, वसतिगृहे टप्प्याटप्प्याने सुरू करावेत, ज्या विद्यार्थ्यांनी कोव्हिड-१९ ची लस घेतलेली नाही, त्यांच्याकरिता स्थानिक जिल्हा प्रशासनाशी समन्वय साधून लसीकरणासाठी विशेष मोहीम राबवावी. तसेच शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे देखील लसीकरण प्राधान्याने करून घ्यावे, अशा सूचना कृषिमंत्री भुसे यांनी दिल्या.

पुण्यनगरी

# आजपासून कॉलेज कट्टे गजबजणार!

## लसींचे दोन डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश

मुंबई : कोरोनाच्या संकटामुळे मागील दीड वर्षापासून बंद असल्याने सुने सुने असलेले कॉलेज कट्टे बुधवार, २० ऑक्टोबरपासून पुन्हा गजबजणार आहेत. विद्यार्थ्यांचे कोरोना प्रतिबंधक लसींचे दोन डोस घेऊन पूर्ण झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. ज्या विद्यार्थ्यांचे दोन डोस पूर्ण झालेले नाहीत, अशा विद्यार्थ्यांना ऑनलाइन सुविधा उपलब्ध करण्याच्या सूचना राज्य सरकारने महाविद्यालयांना केल्या आहेत.

▸▸ पान ७ वर

## आजपासून कॉलेज कट्टे गजबजणार!

राज्याच्या ग्रामीण भागांतील इयत्ता पाचवी ते बारावी व शहरी भागांत इयत्ता आठवी ते बारावीचे वर्ग ४ ऑक्टोबरपासून सुरू करण्यात आले आहेत. कॉलेजचे विद्यार्थी हे १८ वर्षांवरील असून बहुतांश विद्यार्थ्यांचे लसीकरण झाले आहे. तसेच राज्यातील कोरोनाबाधित रुग्णांची संख्याही आटोक्यात आली आहे. त्यामुळे राज्यातील सर्व विद्यापीठे व संलग्नित कॉलेजांमध्ये कोविड प्रतिबंधात्मक सर्वसाधारण उपाययोजना करून विद्यार्थ्यांसाठी ऑफलाइन पद्धतीने नियमित वर्ग सुरू केले जाणार आहेत. या पार्श्वभूमीवर महाविद्यालये २० ऑक्टोबरपासून सुरू करण्याचे आदेश उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून राज्यातील सर्व विद्यापीठांना दिले होते. त्यानुसार महाविद्यालये सुरू होणार आहेत.

प्रत्येक जिल्ह्यातील कोरोनाची परिस्थिती पाहून महाविद्यालय सुरू ठेवायचे की नाही, हा निर्णय घेण्याचा अधिकार स्थानिक प्रशासनाला देण्यात आला आहे. अभियांत्रिकी, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुविशारद, हॉटेल मॅनेजमेंट यांसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांची एकूण २३३ महाविद्यालये आहेत. या सर्वांच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना हजर राहण्याचे आदेश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिले आहेत. त्यानुसार महाविद्यालये सज्ज झाली आहेत. कोरोनाचे नियम पाळून महाविद्यालये सुरू करण्यात येतील. वसतिगृह मात्र टप्प्याटप्प्याने सुरू केली जाणार आहेत. विद्यार्थ्यांना लसींचे दोन्ही डोस घेणे आवश्यक आहे. तसेच महाविद्यालयांत विद्यार्थ्यांना आरोग्य सुरक्षेसाठी मास्क, सॅनिटायझर व फिजिकल डिस्टन्सिंगचे पालन करणे अनिवार्य असणार आहे.

### कॉलेजांसाठी मुंबई विद्यापीठाची नियमावली -

▪ लसीचे दोन्ही डोस पूर्ण न झालेल्यांना संकुलात प्रवेशबंदी
▪ प्रत्येकाच्या मोबाइलवर आरोग्य सेतू ॲप असणे गरजेचे
▪ कॉलेजांचे वर्ग सुरू करताना ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेने सुरू करताना कोरोनाच्या आजाराचा स्थानिक पातळीवरील प्रादुर्भाव व स्थानिक परिस्थिती, प्रतिबंधित प्रक्षेत्रांचे नियोजन व आरोग्यविषयक पायाभूत सुविधांची उपलब्धता या बाबी विचारात घेण्यात याव्यात ▪ कोणी आजारी वाटत असल्यास त्यांना तातडीने डॉक्टरांच्या सल्ल्याने उपचार उपलब्ध करून देणे ▪ एखादा रुग्ण आढळल्यास त्या भागाचे निर्जंतुकीकरण करून पुढील काम सुरू करावे. ▪ पूर्णवेळ मास्कचा वापर आवश्यक ▪ वसतिगृहे टप्प्याटप्प्याने सुरू करावीत ▪ दोन डोस न घेतलेल्यांसाठी ऑनलाइन वर्ग

तरूण भारत

# महाविद्यालये, अधिविभाग आजपासून सुरु

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत अधिविभाग व महाविद्यालयातील अंतिम वर्षातील प्रथम सत्राचे वर्ग बुधवार (दि.२०) पासून सुरु होणार आहेत. हे वर्ग सुरू करताना शिवाजी विद्यापीठ, जिल्हा प्रशासन, राज्य शासन, केंद्र शासनाकडून येणाऱ्या सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहणार आहे. पदवी द्वितीय वर्षाचा निकाल जाहीर न झाल्याने पदवी अंतिम वर्षाचे वर्ग कसे सुरू करायचे, असा प्रश्न महाविद्यालयांसमोर आहे. परंतू तातुरती नावनोंदणी करून वर्ग सुरु करण्याचा निर्णय महाविद्यालयांनी घेतला आहे.

शासन आदेशानुसार आजपासून महाविद्यालये सुरू करण्यास परवानगी दिली आहे. कोरोनाचे दोन डोस पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनाच महाविद्यालयात किंवा विद्यापीठात प्रवेश देण्याच्या सूचना आहेत. त्याचबरोबर ५० टक्के क्षमतेची अटही आहे. त्यामुळे विद्यापीठाने महाविद्यालय व विद्यापीठ अधिविभागातील अंतिम वर्षाचे वर्ग सुरुवातीला सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये बी. ए., बी. एस्सी., बी.



■ कोरोना नियमांचे पालन करण्याच्या सूचना

कॉम., एम. ए., एम. एस्सी., एम. कॉम., इंजिनिअरिंग, फार्मसी, आर्किटेक्चर, एम. बी. ए., अशा अभ्यासक्रमांचा समावेश आहे. ज्या विद्यार्थ्यांचे कोरोना लसीकरण पूर्ण झालेले नाही, त्यांचे लसीकरण पूर्ण करण्यासाठी महाविद्यालयांनी लसीकरण शिबिराचे आयोजन केले आहे. एस.वाय. बी.ए. व एस. वाय. बी. एस्सी.चा निकाल जाहीर झाल्याशिवाय महाविद्यालयातील वर्ग सुरू होणार नाहीत.

## विद्यार्थ्यांच्या लसीकरणासाठी शिबिर घेणार

पदवी द्वितीय वर्षाचे निकाल जाहीर झाले नसल्याने बुधवारपासून पदवी अंतिम वर्षाचे वर्ग सुरू करता येणार नाहीत. त्यामुळे पदवी प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षातील किती विद्यार्थ्यांनी कोरोना लसीकरण पूर्ण केले आहे. यासंदर्भातील माहिती मागवण्यासाठी एक गुगल अर्ज तयार करून माहिती मागण्याचे काम सुरू आहे. संपूर्ण माहिती मिळाल्यानंतर शिवाजी विद्यापीठ व महानगरपालिकेच्या सूचनेप्रमाणे १८ ते २८ ऑक्टोबरच्या दरम्यान लसीकरण शिबिर घेणार आहे. त्यामुळे दिवाळीनंतर शासन आदेशानुसार वर्ग सुरू होतील.

**प्राचार्य डॉ. राजेखान शानेदिवाण (शहाजी कॉलेज)**

20 OCT 2021 तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'रेशीमशास्त्र केंद्राचे कार्य दिशादर्शक'

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर ऑफ एक्सलन्स इन सेरिकल्चर केंद्राचे कार्य शेतकऱ्यांसाठी अत्यंत दिशादर्शक स्वरुपाचे आहे, असे गौरवोद्गार महाराष्ट्राच्या रेशीम संचालनालयाचे प्रादेशिक संचालक महेंद्र ढवळे यांनी काढले.

जिल्ह्यातील रेशीमशेती, गडहिंग्लज येथील अंडीपुंज निर्मिती केंद्र आणि शिवाजी विद्यापीठातील सेंटर ऑफ एक्सलन्स इन सेरिकल्चर आदी विविध उपक्रमांची पाहणी आणि शेतकऱ्यांच्या गाठीभेटी व चर्चेसाठी ढवळे कोल्हापूर दौऱ्यावर आहेत. विद्यापीठाला त्यांनी सदिच्छा भेट दिली.

ढवळे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या रेशीमविषयक केंद्राने शेतकऱ्यांना शैक्षणिक तसेच प्रात्यक्षिके दाखवून मार्गदर्शन केले आहे. अगदी कोरोना काळातही शेतीशाळेसारखा साप्ताहिक उपक्रम ऑनलाईन राबवून रेशीम उत्पादकांना सातत्याने मार्गदर्शनाची भूमिका घेतली आहे. यातून शेतकऱ्यांच्या प्रबोधनाचे कार्य केंद्राचे संचालक डॉ. ए.डी. जाधव यांनी केले आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते ढवळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. ए.डी. जाधव, जिल्हा रेशीम अधिकारी भगवान खंडागळे, अनिल संकपाळ आदी उपस्थित होते.